**Savitribai Phule Pune University**
(Formerly University of Pune)
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

Director,
Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune-411007
Phone No. : 020-25621345/1341/1343
E-mail : coe@unipune.ac.in
bee@pun.unipune.ac.in

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे-४११००७
दूरध्वनी क्र.०२०-२५६२१३४५/१३४१/४३
Website : www.unipune.ac.in

संदर्भः पमूमं/२०२६/ दिनांक : ३०/०५ /२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
प्रस्तुत विद्यापीठ (पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा व नगर हवेली)

**विषय : सत्र पूर्तता संपलेल्या अंतिम व अंतिमपूर्व वर्षातील फक्त अनुशेष विषय असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत...**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळांने घेतलेल्या निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना याद्वारे कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांचे अंतिम व अंतिमपूर्व वर्षातील फक्त अनंशेष विषय (Only backlog students) अद्याप अनुत्तीर्ण आहेत, ते पूर्ण करून पदवी प्राप्त करण्याची अंतिम संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत परिपत्रक परीक्षा छावता/६९३ दि. १५/०५/२०२६ मध्ये सविस्तर वर्णन उपलब्ध आहे. त्या अनुषंगाने परीक्षा अर्ज संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. विद्यार्थ्यांनी यासाठी त्वरीत आवेदनपत्र भरून संबंधित महाविद्यालयाकडून इनवर्ड करून शुल्क भरणे गरजेचे आहे.

अशा सर्व विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा दि. १६ जून २०२६ पासून घेण्यात येणार आहे. सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येईल. यात महाविद्यालयीन स्तरावरील अंतर्भाव असलेल्या परीक्षा देखील जून २०२६ व १५ जुलै २०२६ पर्यंत पूर्ण करावयाच्या आहेत. महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षांचे कार्यपध्दती व वेळापत्रकाबाबत स्वतंत्रपणे लवकरच कळविण्यात येईल.

सदर पत्राचा आशय सर्व संबंधितांच्या निर्दशनास आणुन द्यावा. मा. प्राचार्य/संचालकांना यापुढे विनंती करण्यात येते की, या संदर्भातील कार्यवाहीसाठी महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी (CEO) यांचे मार्फत विद्यापीठाकडे संपर्क करावा. विद्यार्थी / पालक यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचा व पालकांचा प्रवास, अनुषंगिक खर्च व वेळ वाचू शकेल, तसेच विद्यापीठ व महाविद्यालयाची राष्ट्रीय हिताच्या व प्रधानान्याच्य आवाहनास प्रतिसाद दिला असे दिसेल. तसेच विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळेल यासाठी पुढाकार घ्यावा.

कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची योग्य ती दक्षता घेऊन कार्यवाही करावी व विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. राजेंद्र तलवारे)
संचालक
परीक्षा व मूलयमापन मंडळ